म. ग्रं. सं. ठाणें,
विषय काव्य
वा. नं. ६०

१२e

काव्य

म. ग्रं. सं. ठाणें

सन

विषय [illegible]

लेखक [illegible]

संग्रहालय क्रमांक [illegible]

पुस्तकाचें नांव [illegible] ३६०

बा.ग्रा.व्य 60
2

THE PADYASÛDHA OR NECTAR OF VERSES.

BY

PÚRÚSHOTTAM BÁLKRISHNA JÓSHI

PRINTED AT THE "NIRNAYA-SAGAR" PRESS.

BOMBAY.

1882.

Price six Annas.

बा.काव्य 60
2

THE PADYASÛDHA

OR

NECTAR OF VERSES.

BY

PÚRÚSHOTTAM BÁLKRISHNA JÓSHI

PRINTED AT THE "NIRNAYA-SAGAR" PRESS.

BOMBAY.

1882.

Price six Annas.

पद्यसुधा.

हें पुस्तक,

पुरुषोत्तम बाळकृष्ण जोशी

ह्यांनीं रचिलें

तें

मुंबईत,

'निर्णयसागर' छापखान्यांत छापिलें.

(सन १८६७ च्या २५ साव्या कायद्याप्रमाणें नोंदिलें आहे.)

किंमत ६ आणे.

शके १८०४. इ० स० १८८२.

कैलासवासी स्वदेशभक्तमुकुटमणिविद्वज्जनमान्य

रा. रा. गणेश वासुदेव जोशी

जे

स्वदेशप्रीति, औदार्य, परोपकृतिपरायणता,

सद्वर्तन आणि परदुःखदुःखितता

इत्यादि अनेक अनुकरणीय सद्गुणांनीं मंडित असल्या-

मुळें महाराष्ट्रदेशवासी जनास अत्यंत

प्रिय झाले होते

त्यांस

ह्यांच्या आनंदजनक स्मरणार्थ हें पुस्तक

ग्रंथकर्त्यानें सविनय

अर्पण केलें आहे.

PREFACE.

It is a general complaint that the Vernaculars of our country are largely neglected. This neglect is not unnatural. Whatever may be said about the Sanskrit language, nobody will assert that any of the dialects of which Sanskrit is the mother, possesses a literature worthy of the name. Few of the works in them are original. Most of them are translations from Sanskrit, Persian, or English, and they too of no very high order. No wit, no humour, no eloquence, no profound thoughts, are found in them. Who can expect these dialects to stand against English—the language of our rulers, the language of merchants, the language of *freemen*,—a language that has enlightened and enlivened our minds by its useful and charming literature, and has opened to our view a vista of boundless knowledge? Now that our minds have been captivated by its charms, the Vernaculars have been given up. Shakespeare and Milton, Bacon and Locke, Fielding and Scott, Burke and Macaulay, Hume and Mill, and Byron and Tennyson have become the rage. We read and admire their works, speak and write their language, think and appreciate their thoughts, and almost identify ourselves with the great nation whose intellect they represent. Imbued with the ideas of freedom and equality inculcated everywhere in English literature and trusting in the good intentions of the English nation

and its leaders, if at any time the educated Natives call upon the Government to remedy some of their grievances (and some grievances must occur even under the best of Governments) their complaints are met with the imputation of *disloyalty* reiterated against them by men of feeble and suspicious minds, men who fear their own shadows and who do not seem to understand even the meaning of the word they so frequently use. But, let that pass; as brighter days are dawning over India, for, the monster of the *Black** *Act*—a creation of Lord Lytton's fancy—which, for a time was held in terrorism over the Indian Peninsula and seemed to nip in the bud the progress of the infant Vernacular literature, has at last received a death-blow at the hands of Lord Ripon, and under the benign and parental rule of our worthy and popular Viceroy, and under the auspices of the liberal-minded Liberal Ministry, the readers of the Vernacular literature in general, and its scholars and enthusiasts in particular, have commenced to breathe in the pure atmosphere of English liberty! But to return to our subject.

Hence it is not unnatural, in these days, to see the *alumni* of our colleges declaiming and writing in English, often in very good English too, on arts and sciences, on politics and religion, and yet these very men can scarcely speak a sentence in their own Vernacular, which does not contain some English word, expression, or idiom. Nay this is carried to such an extent that on one occasion we were amused

* The Vernacular Press Act.

to see an *alumnus* of our University ignorant of his native tongue, addressing in English a large audience most of whom did not understand the English alphabet. Of course an interpreter was required to translate the speech for the benefit of the hearers !!!

Now if the masses of the people be in a position to obtain a sound knowledge of English much harm would not result from neglecting the Vernaculars. But that is scarscely possible. If, therefore, we want to educate them, we must do so through the medium of our Vernaculars, which will give them the double advantage of learning much with little difficulty. For this purpose many treatises must be written upon different subjects calculated to attract the attention of all. Poems should be composed, and dramas, histories, biographies and novels written, to make the language popular. This task should be undertaken by men qualified to do justice to the subject chosen, by their knowledge of the literature of Europe. But it is in vain to expect this from such men, who, as we have stated above, are ignorant of their native languages, in proportion to their knowledge of English.

The Marâthi language, for example, is spoken by a race which has played no unimportant part in the history of India, a race which has produced many warriors and many men of acute intellect and vast attainments. The descendants of this race form the bulk of the students in our Schools and Colleges. They receive the highest education which it is in the power of our Universities to bestow. They turn out excellent logicions, mathematicians, politicians, and lawyers.

And yet what have these men done for the language spoken by their mothers and sisters, their wives and children? If this state of things continues for any length of time, the Marâthi language will lose all its charms and with that will die away the spirit of the race! Under such circumstances the untimely death of Vishnoo Shâstri Chiploonker, the ablest Marâthi writer of the day is a great blow to the Marâthâ Community! His boldness, his integrity, his ardent patriotism, his excellent style, his critical acumen, and the zest with which he entered upon all subjects, had won the hearts of his readers and inspired them with a portion of his enthusiasm. He is now gone! and gone for ever! but on the capital of the Peishwâs he has made a mark which will not soon be erased.

Byron remarks in his "English Bards and Scotch Reviewers" that he took up the cudgels against the reviewers, because he did not find them taken up by abler men than himself, just as even a country-practitioner is a godsend in a case in which a regular physician cannot be available. It is with almost the same feeling that the following attempt is made, and if it leads the way to greater ones the writer will think himself amply repaid for all his labour.

The present work contains the following subjects:—1 Bhâratawarsini. 2. Address to death. 3. The great Shiwâjee. 4 Ahalyábâi, queen of Indore. 5 The right Hon'ble, Mr. Fawcet, the blind champion of India in Parliament.

It will not be out of place here to give a short

sketch of the first poem of the series. The author proceeds on a tour to the Himalayas. While climbing the mountain he is greatly struck with the beauty of the natural objects around him. When he had proceeded farther, beholding a charming bower of creepers he enters it and reclines on the ground. The time and the place work their effect on him. His fancy is aroused, and he forgets all his cares and fatigues. It is now night. Darkness reigns supreme. Lions and tigers and other beasts-of-prey howl and roar in the wilderness, and he finds himself in a great dilemma as to what to do and where to go. Suddenly he sees before him a beautiful edifice brilliantly lighted up, from which proceeds a voice crying:—" Assemble here all ye who boast of the name of Âryas. " Your mother "*Bhâratawarshini*" is coming." Hearing this voice he casts his glance towards the mansion and finds that it is crowded with 'Âryas.' Soon after there comes in *Bhâratawarshini* accompanied by two damsels. All rise up and make obeisance. She then harangues them to the following effect :—

There was a time when the Aryas were the foremost nation upon earth : when they were virtuous and free. They then had most intimate relations with her fair companians whom she now introduced as देशप्रीति (Patriotism) and 'नीति' (Morality). The tie, however, that bound them together began gradually to relax till at last it was completely snapped asunder. Virtue and Liberty then fled from the country, Malice, ignorance, selfishness, and indolence crept in and made men captive. The neighbouring Maho-

medans who were burning to despoil the country of her riches now seized the opportunity offered to them. They spread all over the country carrying fire and sword with them wherever they went. Anarchy reigned supreme. It seemed evident that the Aryas would be swept off the face of the earth. But the fates had decreed otherwise. *Bhárata-warshini* could not long bear to see the evils that her favourite people had brought on themselves by their misconduct. She prayed to God to relieve them from their wretched plight. The Almighty listened to her prayer and promised to send the Western people to India for her deliverance from the Moslems. Coming to India under His directions, the English suppressed all disorders and restored the reign of law. They hold the land in trust for her people and when they have taught them how to manage their own affairs, they will lay down the reins of government and retire. To prepare themselves for such an occasion, Bhâratawarshini exhorts the Aryas to study the ways of their rulers and to imitate all their noble qualities. She again exhorts them to take to their home *Patriotism* and *Morality* whose separation from them has been such a fruitful source of misery.

About this time the rays of the Sun fall on the face of the author, and he starts up to find that all this was but a dream!!

Bombay 11th
November 1882.

P. B. JOSHI.

प्रस्तावना.

फुल्लेषु यः कमलिनीकमलोदरेषु
चूतेषु यो विलसितः कलिकांतरस्थः
पश्याद्य तस्य मधुपस्य शरद्व्यपाये
कृच्छ्रेण वेणुविवरे दिवसाः प्रयांति! १

भावार्थ

गेले ज्याचे दिन कमलिनी-मध्यदेशीं सुखानें
दिव्याम्राची रुचिर कलिका भोगिली नित्य ज्यानें
होऊनी तो अलिवर शरत्काळ जातां विदेशी
कष्टें कंठी कठिण दिवसां वेणुमध्यप्रदेशीं! १

वाचकहो! खरोखर आपली प्रकृत स्थिति वरील पद्यांतील वेणुविवरनिवासी भ्रमरासारखी झाली आहे! आमची वसंत ऋतूतील टवटवी व बहार आणि शरद् ऋतूंतील शोभा हीं नाहींशीं झालीं, आणि शिशिर ऋतूंतील प्रखर थंडीच्या तडाक्यांत आम्ही सांपडून आमची कल्पनाशक्ति व शरीरें जणुं काय आकुंठित व आकुंचित झालीं आहेत! इक्ष्वाकुकुलमुकुटमणी **रामचंद्राचे** अनुपमेय सद्गुण आणि सामर्थ्य, **युधिष्ठिराचें** सत्यवचनत्व आणि धर्मभीरुत्व, **हरिश्चंद्राचें** वचनपरिपालनत्व आणि परोपकृतिपरायणता, फार तर काय, पण आजकालच्या परम प्रिय आर्यकुलावतंस श्रीछत्रपति **शिवाजी** महाराजांचे पराक्रम, रणपटुत्व आणि निःसीम स्वजनहितपरायणता, **महादजी** शिंद्याची तवारबहादुरी आणि स्वदेशवात्सल्य, **बाजीरावाचें** धैर्य आणि स्वाभिमान, **संगराण्याचें** शौर्य आणि स्वदेशाभिमान, **ताराबाईची** स्वदेशप्रीति आणि दृढ निश्चय, आणि **फडनाविसाचें** चातुर्य आणि दूरदृष्टि हीं सर्व आमच्यांतून विनष्ट होऊन

आम्हाला आतां स्वप्नवत् भासूं लागलीं आहेत! आज आर्यजनांचें शौर्य गेलें, धैर्य गेलें, स्वातंत्र्य गेलें, कीर्ति गेली, संपत्ति गेली! आणि हर! हर! ऐक्य आणि स्वदेशप्रीति हीं देखील आमच्या हृदयांतून समूळ विनष्ट झालीं!! आणि मग राहिलें तें काय? कुदशेचीं चिन्हें–'**मत्सर**' आणि '**अन्योन्यद्वेषबुद्धि**!' आतां आम्हाला आमचें मुख्य कर्तव्य म्हणून हेंच वाटतें कीं, सत्ताधीशचरणारविंदीं अलिसम तल्लीन होऊन, स्वकार्यसाधनार्थ स्तुतिपाठगुंजारवानें खाविंदांचीं (अधिकारापन्नजनांचीं) कर्णेंद्रियें परितृप्त करावीं! म्हणजे झाली इष्टकार्यसिद्धि! शिष्टजनांत गणना! आणि कर्तव्यपरिसमाप्ति!!

सारांश, सांप्रत आमच्यांत स्वकार्यसाधनेच्छा जनसमूहहितेच्छेपेक्षां अत्यंत बलवत्तर वाढत चालली आहे, ही गोष्ट परम शोचनीय होय. जातिभेदजन्य 'मत्सर' व 'अन्योन्य-द्वेषबुद्धि' हीं आमच्या हृदयांत अगदीं बिंबून गेलीं आहेत, व ह्यांपासून होणाऱ्या भयंकर परिणामांचीं ढळढळीत उदाहरणें नेहमीं आपल्या पाहण्यांत येतात. प्रियवाचकहो! ही स्थिति नाहींशी व्हावी, व आपल्या देशाची उन्नति व्हावी, असें जर मनःपूर्वक आपणांस वाटत आहे, तर आपणांपैकीं प्रत्येक व्यक्तीनें आपल्या अंतःकरणांत देशप्रीति व बंधुप्रेम ह्यांचें बीजारोपण करून, सामाजिक हितार्थ निरंतर प्रयत्न केले पाहिजेत; आणि '**जलबिंदुनिपातेन क्रमशः पूर्यते घटः**' ह्या न्यायानें प्रत्येक बांधव जर आपलें कर्तव्य करूं लागेल, तर इष्ट हेतु सिद्धीस जाण्यास फारसे कष्ट लागणार नाहींत. असो.

प्रिय वाचकहो! आतां आपला विशेष वेळ न घालवितां इतकेंच सांगतों, कीं वरील उद्देशासच अनुलक्षून स्वजनसेवासाधनार्थ, '**पद्यसुधा**'पुस्तकरूपानें हा अल्प प्रयत्न केला आहे. आतां प्रस्तुत काव्यांत गुण दोष काय आहेत, व ग्रंथकर्त्याचा प्रयत्न कितपत सिद्धीस गेला आहे, ह्याचें अनुमान करणें आपणांकडेस आहे; का-

रण म्हटलें आहे:- '**कविः करोति काव्यानि रसं जानाति पंडितः**' म्हणजे कविजन काव्यें रचितात परंतु त्यांतील रसाचे खरे वेत्ते पंडितजन होत.

मुंबई-कार्तिक शुक्ल प्रतिपदा शके १८०४. } **पुरुषोत्तम बाळकृष्ण जोशी.**

का०७४
११८

पद्यसुधा.

भारतवर्षिणी-काव्य

प्रारंभः

मंगलाचरण.

ज्यानें स्वेच्छाप्रभावें अनुपमरचना निर्मिली विश्वमाला
स्वेच्छेनें चालवी जो अनुपहतगति स्वीयसृष्टिक्रमाला।
प्रज्ञाचक्षुस्सुदृश्य प्रकृतिरहित जो सर्वकृन्निर्विकारी
विज्ञानी, आर्यवृंदा अमर अजर तो हो यशस्सौख्यकारी.

ज्याचीं तुंग सुरम्य दिव्य शिखरें मेघोदरां भेदिती
प्रालेयान्वित जीं गभस्तिकिरणीं रौप्याकृती भासती।
नाना दिव्य सुगंध पादप लता पुष्पें फळें शोभती
यत्प्रांतीं, स्तविती कवीश्वर जया जो भूधरांचा पती॥१॥

ज्या पर्वतीं त्रिपुरनाशक शूळपाणी
सर्वस्व घेइ पण जिंकुनि जैं मृडानी।
होऊन रुष्ट परिवर्जुनि भामिनीला
झाला उमापति पुरा वश भिल्लिणीला॥२॥

ज्याचा पुराण महिमा कथिती पुराणें
ज्याच्या शिरीं वसुनियां बहु रंक राणे ।
गेले करून सुतपा प्रभुच्या पदातें
यावें सकृत् बघुनि त्या हिमपर्वतातें ॥ ३ ॥

चित्तीं धरूनी दृढ निश्चया या
गेलों त्वरें पर्वतराजठायां ।
पाहून शोभा कमनीय त्याची
झाली विचित्र स्थिति मन्मनाची ॥ ४ ॥

अवर्ण्य आहे गिरिराजशोभा
कवी कशी वर्णिल तद्यशोभा ।
वृक्षांचिया तेथ असंख्य जाती
मेघोदरें भेदुन दूर जाती ॥ ५ ॥

कित्येक सुंदर सुधाकर पुष्पवृक्ष
गंधें जयीं जमति षट्पद लक्षलक्ष ।
भृंगांस तृप्त करिती मधुपानदानें
गुंजारवा करिति षट्पद ही सुखानें ॥ ६ ॥

मंदार कुंद कटुलिंब सुरू कदंब
दाडिंब देवतरु सुंदर ते विलिंब ।
विस्तीर्ण तुंग वट पिप्पल सौख्यदायी
नेत्रांस हर्ष बहु दे घन आंब्रराई ॥ ७ ॥

बहुविधा सहकार विराजती
शुक पिका वरि नाचति कुंजती ।
उडति बागडती वरि माकडें
पसरिती कर आम्रफळांकडे ॥ ८ ॥

त्या दूर नीच दिसती फळवृक्षहारी
हे साग शीसव किती घनदाट भारी ! ।
ते दीसती खदिरपादप यूपयोग्य
यूपा करूनि अमरीं वरिलें सुभाग्य ॥ ९ ॥

ह्या रम्य नूतनवयस्क-लता सकामा
रम्याकृती निजपती-सहकार-धामा ।
सानंद येति परिरंभिति वल्लभांतें
कामातुरां विरहदुःख न सोसवे तें ॥ १० ॥

हे दीसती पुढति पादप चंदनाचे
ज्यांच्या वरीं भुजगवृंद सहर्ष नाचे ।
तत्सौरभा भुलुनि सोडिति ना तयांतें
त्यांच्या सवें जमविती प्रियमित्रनातें ! ॥११॥

हे झीजवीति निजदेह परोपकारीं
जाणून नागगण होति तयीं विहारी ।
देती न दुष्ट करूं त्यांस परोपकारा
सत्कार्यभंजक सुदुर्जन-वृंद सारा ! ॥ १२ ॥

हें *गौरिशंकर तरी किति उंच आहे !
*कैलास काय गमतें गगनांत राहे !! ।
वस्त्रें करूनि हिरवीं परिधान योद्धे
मेघांसवें करिति हे जणुं काय युद्धें ! ॥ १३ ॥

हे नीच पंक्ति दिसते धरणीधरांची
वाटे चमूच जणुं हे नग–सैनिकांची ! ।
पूर्वोक्ततुंगगिरि ह्या गमती चमूचे
सेनापति प्रवल संगरधीर साचे ॥ १४ ॥

वारिप्रवाह जणुं हे मधुर स्वरानें
संगीत गाति बहु तोषविती रवानें ! ।
कर्णेंद्रियांस, मृगशावक हे समस्त
वारिध्वनि श्रवुनि नाचति हर्षयुक्त !! ॥ १५

पुढें दृष्टि टाकीं दिसे रम्य झाडी
वरी शोभती दिव्य पुष्पें पहाडी ।
मधें दीसली रम्य जागा वसाया
जणूं दर्शवी "पांथ येथें वसा या" ॥ १६ ॥

क्षणैक तयिं बैसलों मग करीं मनीं कल्पना
पुरा वसति सन्मुनी गिरिशिरीं न त्या जल्पना ।
पुरा कुणि मुनी करी स्थळ करावया हें तपा
अहा ! किति सुरम्य हें !! हरि तरी किती आतपा !!!

*गौरिशंकर आणि कैलास नांवाचीं हिमालय पर्वताचीं शिखरें.

हें भासतें मज लताग्रृह सृष्टिजन्य
आहे किती तरिहि ईश्वर हो वदान्य ! ।
चिंतावया सुमुनि येति वनीं पदांतें
जाणून निर्मि रमणीय लताग्रृहांतें ! ॥ १८ ॥

इथें सन्मुनी चालवी अग्निहोत्र
असें दर्शवी शेषरक्षा पवित्र ।
मुनीचें किती जीर्ण हें व्याघ्रचर्म !
जयीं बैसुनी चालवी नित्यकर्म ॥ १९ ॥

ह्या झूलती वनलता मृदु पुष्पहारीं
हीं श्वेत ताम्र पिवळीं मधुयुक्त सारीं ।
वारा कितीतरि सुगंध विमंद वाहे !
हें स्थान सौख्यद किती रमणीय आहे!! २०

सकळ पळति चिंता चित्त होई प्रसन्न
सुखद उटजि ऐशा कोण होईल खिन्न ? ।
विसरुनि मन जातें दुःखशोकादि सारें !!
विफल गमति येथें संसृतीचे पसारे !!! २१

अहा ! या अशा येउनी रम्य जागीं
गमे ज्या न आनंद तो दुःखभागी ।
सदाचा ! जरी ठेविलें इंद्रलोकीं
तयाला तिथें सौख्य कैचें विलोकीं ! ॥२२॥

ऐसे करीं विविध जों स्वमनीं विचार
अस्ताचलाप्रति गभस्ति करी विहार।
झाल्या दिशा सकल अंधुक कृष्णवर्ण
वृक्षादि सर्व दिसती मग दिक्सवर्ण॥ २३ ॥

कांहीं दिसे नच तिथें मग आसपास
झालों तदा निजमनीं बहु मी उदास।
भासे भयानक निशा जणुं काळरूपी!
ग्रासील काय गमली बघतां स्वरूपीं! ॥२४॥

महा किंकळ्या फोडिती व्याघ्र मस्त
शिवा भुंकती ओरडूनी समस्त!।
तयांचा जणूं वल्लभप्राण गेला
जयाकारणें जीव त्यांचा भुकेला॥ २५ ॥

मदोन्मत्त तों नायक श्वापदांचा
जया पाहतां बंद होते स्ववाचा!।
करी गर्जना घोर मोठी प्रचंड
करी कीं गमे श्वापदां देहदंड!॥ २६ ॥

अकस्मात तों वीज मोठी कडाडे
महागर्जना होउनी भूमि झाडे।
हलूं लागलीं हो जसा भूमिकंप
तसा जाहला पंचभूतीं प्रकोप!॥ २७ ॥

अकस्मात तों दीप लक्षानुलक्ष
दिसूं लागती जेथ होते सुवृक्ष।
तिथें जाहलें भव्य मंदीर तुंग
जयाचा दिसे कांचनी दिव्य रंग ॥ २८ ॥

"देवी भारतवर्षिणी भगवती तुह्मांस दे दर्शना
याहो सज्जन या स्थळीं सकळही प्रेमें करा वंदना"।
ऐसे शब्द करोनियां श्रवण तैं मोठा स्वकीयांतरीं
वाटे विस्मय फार नेत्र मग त्या लावीं गृहाभ्यंतरीं२९

अकस्मात तों फार गर्दी उडाली
सभा त्या स्थळीं सज्जनांची मिळाली।
सभाभ्यंतरीं सर्वसौंदर्यखाणी
दिसे वैसली आर्यदेवी शहाणी ॥ ३० ॥

करीं शिरिं शरीरिं वा वरि न भूषणें दिव्य ती
गमे न गत-भर्तृका न सधवा तशी ती सती!।
दिसे विगतवैभवा अनुपमेय दुःखानलीं
गमे सुमुखिची अहा! सुरुचिरा तनू पोळली! ॥२१॥

नसे वहुत ठेंगणी बहुत उंचही ती नसे
गमे सुकुलजा तिची रुचिर कांति रम्या दिसे।
विमुक्तच दिसे तिचा कचकलाप निःस्नेह हा!
सुकुंकुम नसे तसें सुमुखि-भाळदेशीं अहा!! ३२

असो, त्या स्थळीं ये जयीं आर्यमाता
उभे राहिले जोडुनी आर्य हस्तां ।
तिला वंदिती सर्वही प्रेमभावें
स्वमाता गमे वंद्य सर्वां स्वभावें ॥ ३३ ॥

"विशुद्धपक्षीं पति यामिनीचा
वाढे जसा नाथ वनस्पतींचा ।
वाढो तशी पुत्र भवत्सुकीर्ती
करो गृहीं वास सदा रमा ती" ॥ ३४ ॥

देऊनि आशिर्वचन स्वपुत्रां
बोले तयांतें जननी पवित्रा ।
"रामा सुरम्या दिसती समीप
ह्या ओळखा पाहुन तत्स्वरूप ॥ ३५ ॥

'देशप्रिती' हे तुमची सुजाया
पतिव्रता वीरजनार्हणीया. ।
सती-परित्याग निरर्थ केला !
कसे तुह्मी बुद्धिविहीन झालां ! ! ॥ ३६ ॥

दुष्यंतभूपें त्यजिली स्वभार्या
विनापराधें स्तवनीय आर्या ।
साध्वीललामाग्रसरा स्वजाया
'सुनीति' तुह्मी त्यजिलीहि वायां ! ! ॥३७॥

'देशप्रिती' 'नीति' वनांत आल्या
त्रासून तुह्मां बहु गांजलेल्या ।
'सद्धर्मबंधू' हि तुह्मी त्यजीला
त्यांच्या सवें तोहि वनस्थ झाला ! ॥ ३८ ॥

तयांस मद्वंधु हिमाचलानें
करूनियां स्वागत आदरानें ।
दिली रहाया रमणीय जागा
आर्यावनीं नित्य हिमाद्रि जागा ॥ ३९ ॥

दयाळु अत्यंत असे नगेंद्र
चिंती मनीं निसिं मदीय भद्र ।
पाहूनियां दीन दशा मदीया
तशी सतींची बहु शोचनीया ॥ ४० ॥

येई तयातें करुणा अपार
सांगे मला तो मग सद्विचार ।
"टाकी" ह्मणे "भारतवर्षिणी तूं
चिंता मनींची भयदुःख किंतू" ॥ ४१ ॥

"आहेस तूं प्रौढवयस्क सुज्ञ
झाले तुझे पुत्र विमूढ अज्ञ ।
ते सेविती दुर्गुण दुष्ट छंद
मला न ते पाहवती कुफंद ! ! ॥ ४२ ॥

देशप्रिती उद्यम ऐक्य नीति
शूरत्व, औदार्य, सुधर्म कीर्ति ।
टाकूनि देती वरिती असूया
तुझ्या मुलां काय अतां ह्मणूं या ? ॥ ४३ ॥

'देशप्रिती' 'नीति' महा सुशीला
येऊनि त्या राहति आश्रमाला ।
माझ्या, सर्वे आणिति 'मा'सतीतें
परी न रानीं करमे रमेतें ॥ ४४ ॥

रमा असे चंचल-वृत्ति भारी
म्हणे न हा आश्रम सौख्यकारी ।
ह्मणून ती पश्चिमदेश धुंडी
झाली तिथें फार तिची घमंडी ॥ ४५ ॥

देशप्रिती उद्यम धर्म नीति
आर्यांत सानंद सुखें रहाती ।
ऐकून हें येइन आर्यदेशीं,
जातां रमा दे मज भाक ऐशी ॥ ४६ ॥

ह्मणूनी मुलां बोधपीयूषपानें
करी शाहणे, व्याप्त जे आळसानें ।
स्वदेशप्रिती नीतिदेवी तयांतें
पुन्हा भेटवी सूचवी पूर्व नातें'' ॥ ४७ ॥

वा. का. ८

श्रवण करुनि ऐसी सूक्ति मद्बांधवांची
विकसित मन झालें वाटली युक्ति साची।
करिन विमल भावें बोध मद्बालकांतें
करुनि मनिं विचारा बोलवीलें तुह्मांतें ॥ ४८ ॥

कशा कारणें आज मी प्राप्त झालें
कशा कारणें आर्य येथें मिळाले।
तुह्मां ठाउकें जाहलें सर्व आतां
तरी भक्तिनें आयका बोधवार्ता ॥ ४९ ॥

वंदूनी जगदीशपादकमलां प्रत्यूहसंहारकां
संक्षेपें कथण्यास इच्छित असें तुह्मां प्रियां बालकां।
मद्वृत्ता सुहितावहा सुखकरा वार्ता सुशिक्षाप्रदा
ऐका त्यामनिं शुद्धभाव धरुनी कल्याण तेणें सदा ५०

एकाग्र चित्त करुनी प्रिय बालकांतें
मोदें करा श्रवण जें कथितें तुह्मांतें।
आणा वितर्क न मनीं जरठा स्वमाता
झाली ह्मणोन कथिते वितथा कुवार्ता॥५१॥

झालें प्रवृत्त करण्या उपदेश आतां
वात्सल्य पोटिं उपजे तुमची पहातां।
दीना दशा मम तुह्मी प्रिय आर्यबाळें
बाळांचिया जननि कां असुखें न पोळे? ॥ ५२॥

देशप्रिती उद्यम ऐक्य नीति
शूरत्व, औदार्य, सुधर्म कीर्ति ।
टाकूनि देती वरिती असूया
तुझ्या मुलां काय अतां ह्मणूं या ? ॥ ४३ ।

'देशप्रिती' 'नीति' महा सुशीला
येऊनि त्या राहति आश्रमाला ।
माझ्या, सर्वे आणिति 'मा'सतीतें
परी न रानीं करमे रमेतें ॥ ४४ ॥

रमा असे चंचल वृत्ति भारी
म्हणे न हा आश्रम सौख्यकारी ।
ह्मणून ती पश्चिमदेश धुंडी
झाली तिथें फार तिची घमंडी ॥ ४५ ॥

देशप्रिती उद्यम धर्म नीति
आर्यांत सानंद सुखें रहाती ।
ऐकून हें येइन आर्यदेशीं,
जातां रमा दे मज भाक ऐशी ॥ ४६ ॥

ह्मणूनी मुलां बोधपीयूषपानें
करी शाहणे, व्याप्त जे आळसानें ।
स्वदेशप्रिती नीतिदेवी तयांतें
पुन्हा भेटवी सूचवी पूर्व नातें'' ॥ ४७ ॥

श्रवण करुनि ऐसी सूक्ति मद्बांधवाची
विकसित मन झालें वाटली युक्ति साची।
करिन विमल भावें बोध मद्बालकांतें
करुनि मनिं विचारा बोलवीलें तुह्मांतें ॥ ४८ ॥

कशा कारणें आज मी प्राप्त झालें
कशा कारणें आर्य येथें मिळाले।
तुह्मां ठाउकें जाहलें सर्व आतां
तरी भक्तिनें आयका बोधवार्ता ॥ ४९ ॥

वंदूनी जगदीशपादकमलां प्रत्यूहसंहारकां
संक्षेपें कथण्यास इच्छित असें तुह्मां प्रियां बालकां।
मद्वृत्ता सुहितावहा सुखकरा वार्ता सुशिक्षाप्रदा
ऐका त्यामनिं शुद्ध भाव धरुनी कल्याण तेणें सदा ५०

एकाग्र चित्त करुनी प्रिय बालकांतें
मोदें करा श्रवण जें कथितें तुह्मांतें।
आणा वितर्क न मनीं जरठा स्वमाता
झाली ह्मणोन कथिते वितथा कुवार्ता॥५१॥

झालें प्रवृत्त करण्या उपदेश आतां
वात्सल्य पोटिं उपजे तुमची पहातां।
दीना दशा मम तुह्मी प्रिय आर्यबाळें
बाळांचिया जननि कां असुखें न पोळे? ॥ ५२ ॥

अर्धी वर्णितें केंवि कीर्ती मिळाली ?
मला केंवि मद्वालकें हृष्ट झालीं ? ।
कसे जाहले पुत्र देशाभिमानी ?
कशी सां धरा फार वानून मानी ? ॥ ५३ ॥

कशी दैवचक्रें पुन्हा चाल केली ?
हरोनी कशी आर्यसंपत्ति नेली ? ।
कशी गांजिली आर्यमाता खलांनी ?
कशी ती तदा विश्वतातास वानी ? ॥ ५४ ॥

कसा धांवण्या धांवला दीनपाळ ?
कसा संकटीं रक्षि आर्यां कृपाळ ? ।
कसा धाडि तो आंगलां आर्यदेशीं ?
कशी घेति ते आर्यसत्ता विदेशी ? ॥ ५५ ॥

झाला इक्ष्वाकुवंशीं रविरुचि नृपति स्वादु यन्नाम राम
कीर्तीनें चंद्रबिंबा धवलकरि जणों, योगिसद्धृद्विराम।
दंडें दंड्यांस दंडी कुजनमद हरी सर्व पाखंड खंडी
धुंडोनी दुष्टझुंडी वधि सुररिपुचीं पंक्तिशीर्षें विखंडी!

संतुष्ट शिष्ट करि देउन इष्टदानें
मोदें लयाप्रति सुदीनजनापदा ने ।
वृष्टी पयोद करिती तयिं योग्य काळीं
कष्टी असेल जन कोण अशा सुकाळीं ? ॥५७॥

रघुपती पति तो मज शोभला
हृदयषट्पद तत्पदिं लोभला ।
मज तदा जन सर्वहि मानिती
मम यशास समृद्धिस वानिती ॥ ५८ ॥

केलें ऐशा प्रकारें
रघुकुळपतिनें राज्य तैं दीर्घकाळ
झाला ह्या आर्यदेशीं
अपरिमित तदा सौख्यसंपत्सुकाळ ।
रामामागून झाले
रघुकुळिं बहु जे शौर्यसंपन्न भूप
देऊनी सौख्य लोकां
मिळविति यश ते भूमिलोकीं अमूप ॥ ५९ ॥

झाला पुढें यदुकुळीं सुगुणैकमूर्ति
सम्राट् सुधीर बहुसंगरलब्धकीर्ति ।
कृष्णाख्य सज्जनहृदब्जविकासकारी
चंडांशु सत्यधन शत्रुतमोपहारी ॥ ६० ॥

श्रीकृष्णविक्रमरवी उदयास आला
तों आसुरी तिमिर सर्व विनष्ट झाला !
झाली प्रजा सुगुणयुक्त सुखी अशेष
आर्यस्तुती करिति लोक तदा विशेष ॥ ६१ ॥

मारी करीं खलजनां हरि दानवारी
गोगोपगोपिजनदुर्व्यसना[1] निवारी !
भारी करी मुदित आर्यजनांस, हारी !
भूभार सत्कृतिबळें सुरगर्वहारी ! ॥ ६२ ॥

वसनहरणकाळीं कृष्ण कृष्णेस तारी
सदयहृदय साध्वी-संकटातें निवारी ।
विजयविजय[2] साह्या देउनीयां करी कीं
मुदित सुजन व्हावे पातकी क्लिष्ट लोकीं ६३

हरी हरि करिव्यथा[3] करि खरी कृपा त्यावरी
तरीच गमतें वरी हरि अशी सदाख्या वरी ।
करीं धरि नतांस वा निखिल विघ्नवृंदां हरी
ह्मणून बुध ठेविती मधुर नाम त्यातें हरी ॥६४॥

झाला पुढें नृप युधिष्ठिर धर्ममूर्ति
नीतिप्रवीण कविसज्जनगीतकीर्ति
सत्यासमान न गमे प्रिय अन्य ज्यातें
देऊनि सौख्य करि हर्षित जो प्रजांतें ॥६५॥

झाले विक्रमशालिवाहन पुढें भोजादि जे भूपती
त्यांची शुभ्र यशोनदी क्षितिवरी अद्यापिही वाहती ।
विद्वच्छिष्टसमूह हृष्ट करिती देऊन मानें धनें
ते संतोषविती कवीश्वरमनें देऊनियां वेतनें ॥ ६६ ॥

---

१ संकटांतें. २ अर्जुनाचा जय. ३ गजेंद्र.

झाले ऐसे विविध नृपती शौर्यशाली सुकीर्ति
देती लोकां सुख अमित ते सद्गुणांच्या सुमूर्ति।
बाळांचें सौख्य निरखुनियां जाहला मोद भारी
सर्वेशाची प्रियसुत तयीं फार झालें अभारी ॥६७॥

तयिं मम सुत कन्या स्वीयराष्ट्राभिमानी
बघुन सुकृति त्यांच्या देव नाकीं[1] विमानीं।
अनुदिन गुण गाती बोलती धन्य रामा
प्रसवलि शिशुरत्नां कीर्तिशौर्याभिरामां! ॥ ६८ ॥

क्षमा शांति प्रीती धृति विनय एकत्र जमती
तयांच्या चित्ताब्जीं भ्रमरसम सानंद रमती
"वरा माला" माला करिं धरुनियां दिव्य विमला
वदे मोदें मोद्या अनुदिन असें त्यांस कमला ॥६९॥

देशप्रीती नवोढा[2]
वधुसम त्द्ददयीं श्लिष्ट होऊन राहे
पीयूषाहून वाटे
प्रियतर बहु त्यां स्वीयमाता धरा हे।
मातृत्राणार्थ देहा
अनुपम रतिनें अर्पिती बाळभावें
हा! हा! ते शल्य झाली
स्मृति मृदुहृदया मोददा जी स्वभावें! ॥ ७० ॥

---

१ स्वर्गी. २ नूतन विवाहित.

योद्धे क्षत्रिय राजसूनु अवघे देशाभिमानी महा
व्हावें भारतवर्षिणी शुभ सदा त्यांच्या मनीं काम हा।
आर्यावर्त-रिपूंस तीक्ष्ण असिनें मारूं मरूं वा रणीं !
त्यागूं देशहितार्थ देह ह्मणती नाहीं असत्कारणीं ॥ ७१

आर्यावर्ती अनिश जन तैं सत्यपीयूष पीती
'सत्याची दे अभिरुचि विभो' ह्या सुमंत्रा जपीती।
दारिद्र्याग्नी निरखुन जनां वर्ततां पुण्यमार्गी
आर्यावर्ता त्यजुन भितिनें अन्यदेशास मार्गी ७२

असे तुह्मां सारें विदित बहुधा आर्यचरित
हरिश्चंद्राचें त्या विबुधनुत कारुण्यभरित।
कसा सत्यासाठीं कुजनसदनीं देह झिजवी
सदाचारें लोकीं यश वरुन सच्चित्त रिझवी ॥ ७३ ॥

सत्य आर्यजनभद्र कराया
आर्यशत्रुजनगर्व हराया।
जाहलें प्रमुख कारण यातें
ध्या करील विपदाविलयातें ॥ ७४ ॥

अहल्या सती शोभवी त्या सुकाळा
सती जानकी षड्गुणैश्वर्यवाळा।
करी सत्कृती कीर्ति लोकांत जोडी
मला आवडे फार हे रम्य जोडी ॥ ७५ ॥

विद्याप्रवीण तयिं आर्यसुता सुवृत्ता
सद्धर्मपालनपरोपकृतिप्रवृत्ता ।
स्वीय प्रशस्य विनयें भुवनत्रयातें
साश्चर्यचित्त करिती वरिती यशातें ॥ ७६ ॥

नाहीं जों कां वरियलि वधू पूर्वदिग् भास्करानें
नाहीं नाकीं फिरविति यदा निर्जर स्वीययानें ।
मुग्धा रम्या मुनिजनसुता तैं उषःकाळ होतां
ईशाचेंतें विमलहृदया सारिती स्तव्यवृत्ता ॥ ७७ ॥

तैशा रम्या मुनियुवतिही क्षेमदोषःसुकाळीं
चंडांशूच्या रुचिर किरणां देखतां अंतराळीं ।
सारूनीयां प्रियगृहविधि स्नानदानक्रियेतें
संपादूनी स्तविति विमल प्रेमभावें अजातें॥७८॥

यत्तोयातें दुरितहरसें मानिती भूमिलोकीं
यत्पादाब्जा नमिति सुर त्या जान्हवीच्या तटाकीं।
प्रातःकाळीं उरकुनि मुनी देहसंमार्जनातें
नाना रागें वरुनि विरती आळवीती अजातें ७९

नाना मनोहर विहंगम रम्यजाती
सानंद नंदनभवोपम मत्प्रजा ती ।
चेतोहर श्रवणमंजुळ गीत गाती !
तैं योगिवृंदभजनानुकृती करीती ! ॥ ८० ॥

आर्यावर्तीं प्रिय सुत तदा ऐक्यवज्राभिघातें
ईशप्रीति त्वरित हरिते जेविं सर्वां अघांतें ।
सद्भक्तांच्या, तदिव करिती वैमनस्याद्रिभंग
सत्कृत्यानें वरिति यश ते भूमिलोकीं अभंग॥८१॥

जेथें उद्यमकेसरी वसति तैं आलस्यशुंडाधरें
प्राणत्राणपरायणें जलदिनें यावें कसें आदरें?
जेथें शांतिपयोनिधींत करिती मद्धालकें मज्जना
केवीं क्रोधदवाग्नि जाळिल तिथें सांगा बरें मज्जनां?

स्वातंत्र्यबुद्धी हृदयांत साठे
सेवा कसी त्यां मग गोड वाटे? ।
परस्परप्रेम जिथें नितांत
राहे कसा मत्सर दुष्ट त्यांत? ॥ ८३ ॥

कठिण बहु मिळाया सौख्य जें भूमिलोकीं
सुरवर सुरलोकीं भोगिती ज्या विलोकीं ।
अनुपम सुख ऐसें सेवितां अब्द गेले
अमित परि मला ते अल्प अत्यंत झाले ॥८४॥

सुखाचे ते जाती सुदिन निमिपार्धासम कसे!
पुढें येतां दुःखें दिवस गमती अब्दच जसे! ।
गतैश्वर्याचें संस्मरण करितें चित्त विकल
अहा! तेव्हां वाटे सकल जग संसार विफल!! ८५

असे कोण या नित्य सूखी जगांत !
असे कोण वा नित्य दुःखी नितांत ! ।
क्रमें लाभती सौख्यदुःखें जनांस
सुखा मागुनी दुःख येणार खास ॥ ८६ ॥

वर्षानुवर्ष मग पूर्वज-सद्गुणांतें
टाकून देति वरिती सुत आळसातें ।
विख्यात आर्य भट संगररंगधीर
झाले पुढें विषयभोगविलासशूर ! ॥ ८७ ॥

परस्पर-प्राण-विनाशहेतू
शिरे असूया हृदयीं परंतु ।
वाटे न त्यांतें तिळमात्र किंतू
वेष्टी जरी भोंवतिं जालतंतु ॥ ८८ ॥

वीरश्रीनें त्यागितां आर्यलोकां
झाली शोच्यस्थीति जे ते विलोका ।
आर्यांचें हो सार्वभौमत्व नष्ट !
राज्याचे ह्या खंड झाले अनिष्ट ! ॥ ८९ ॥

अन्योन्यदेश लुटिती मग आर्यराजे
राजे असें न अभिधान जयांस साजे ।
आर्यांस आर्यजन शत्रुसमान होती !
निंद्य स्थिती न वदवे मजला अहो ती ! ॥९०॥

म्हणे एक मी सूर्यवंशांत झालों !
वदे अन्य तों मीहि तैसाचि आलों ।
कुळापासुनी शीतरश्मींद्र याच्या !
अशा मारिती व्यर्थ वाता फुकाच्या!! ॥ ९१ ॥

'कनकभूमि' गमे जगिं एकही
प्रबल दुर्बल त्यां सकला मही ।
स्वजन शूर किती बहु फांकडे
यवन ते म्हणती किति माकडें ! ॥ ९२ ॥

'मुळीं' बोलती 'आर्य भूमी अजिंक्य
हिमाद्री महा लंघणें हें अशक्य ।
तिहीं बाजुला सर्व पाणीच पाणी
रिपूंची न कां मार्गिं होईल हाणी ?' ॥९३॥

'मधें अटक हे नदी कटक शत्रुचें अल्पसें
महा विकट वाट आक्रमुनि आर्यदेशीं कसें ।
धजेल पद ठेवण्या' करिती तैं अशा कल्पना
विमूढ मम बालकें. अहह ! सा वृथा जल्पना! ९४

विनाशकाळीं विपरीत बुद्धी
होते मनीं दुर्मदगर्ववृद्धी ।
गर्वामुळें होति असंख्य तोटे
जनीं कवी बोलति तें न खोटें ॥ ९५ ॥

आर्यावर्तस्थिती हे
बघुन यवन हा देश जिंकावयाची
वांच्छा चित्तीं धरूनी
करिति निजजनीं सिद्धता सैनिकांची
आर्यावर्तीत आहे
कनक बहुत तें सर्व जिंकून आणूं
अस्मद्देशीं सुखानें
म्हणति यवन तैं स्वासिनें आर्य हाणूं ! ९६

गांधारदेशस्थ महामदानें
नदी विलंघून महा मदानें ।
केला स्वदेशीं प्रथम प्रवेश !
म्लेंच्छीं पदाक्रांत पवित्र देश !! ॥ ९७ ॥

त्या दुष्टें मज दुर्मदें महमदें लूटूनियां हाणिलें
बारावेळ दयेसि वन्य यवनें नाहीं मनीं आणिलें ।
केली कत्तल दुष्टवृत्ति धरुनी बाळांचि माझ्या यदा
आर्यांनीं तयिं बंधुसाह्य न करूं केला ज्ञणूं कायदा ! ९८

पुढें पातला दुष्ट तैमूरलंग
महा घातकी व्याध जैसा कुरंग ।
प्रहर्षें वनीं संहरी सायकानें
तसें मारिलें दीन आर्यां खलानें ! ॥ ९९ ॥

ह्मणे एक मी सूर्यवंशांत झालों !
वदे अन्य तों मीहि तैसाचि आलों ।
कुळापासुनी शीतरश्मींद्र याच्या !
अशा मारिती व्यर्थ वाता फुकाच्या!! ॥ ९१॥

'कनकभूमि' गमे जगिं एकही
प्रबल दुर्बल त्यां सकला मही ।
स्वजन शूर किती बहु फांकडे
यवन ते म्हणती किति माकडें ! ॥ ९२ ॥

'मुळीं' बोलती 'आर्य भूमी अजिंक्य
हिमाद्री महा लंघणें हें अशक्य ।
तिहीं बाजुला सर्व पाणीच पाणी
रिपूंची न कां मार्गिं होईल हाणी ?' ॥९३॥

'मधें अटक हे नदी कटक शत्रुचें अल्पसें
महा विकट बाट आक्रमुनि आर्यदेशीं कसें ।
धजेल पद ठेवण्या' करिती तैं अशा कल्पना
विमूढ मम बालकें. अहह ! या वृथा जल्पना! ९४

विनाशकाळीं विपरीत बुद्धी
होते मनीं दुर्मदगर्ववृद्धी ।
गर्वामुळें होति असंख्य तोटे
जनीं कवी बोलति तें न खोटें ॥ ९५ ॥

आर्यावर्तस्थिती हे
बघुन यवन हा देश जिंकावयाची
वांछा चित्तीं धरूनी
करिति निजजनीं सिद्धता सैनिकांची
आर्यावर्तांत आहे
कनक बहुत तें सर्व जिंकून आणूं
अस्मद्देशीं सुखानें
ह्मणति यवन तैं स्वासिनें आर्य हाणूं ! ९६

गांधारदेशस्थ महामदानें
नदी विलंघून महा मदानें ।
केला स्वदेशीं प्रथम प्रवेश !
म्लेंच्छीं पदाक्रांत पवित्र देश !! ॥ ९७ ॥

त्या दुष्टें मज दुर्मदें महमदें लूटूनियां हाणिलें
बारावेळ दयेसि वन्य यवनें नाहीं मनीं आणिलें ।
केली कत्तल दुष्टवृत्ति धरुनी बाळांचि माझ्या यदा
आर्यांनीं तथिं बंधुसाह्य न करूं केला जणूं कायदा ! ९८

पुढें पातला दुष्ट तैमूरलंग
महा घातकी व्याध जैसा कुरंग ।
प्रहर्षें वनीं संहरी सायकानें
तसें मारिलें दीन आर्यां खलानें ! ॥ ९९ ॥

स्वजन म्हणति तेव्हां "घोर हो काळ आला !
हर ! हर ! हर ! मोठा ईश्वरी कोप झाला !! ।
धरुनि यवनरूपा आर्यदेशीं कृतांत
खचित उतरला हा हाय ! हा ! हंत !! हंत"!!! १००

प्रकारें अशा गांजिती म्लेंच्छ दुष्ट
प्रकारें अशा बोलती आर्य शिष्ट ।
परी हांकण्या म्लेंच्छ लोकांस दूर !
नसे तेधवां एकही आर्य शूर ! ॥ १०१ ॥

यशोदीपिका सर्व तेव्हां विझाली
लुटूनी मला आर्यसंपत्ति नेली ।
पुढें राहणें जाहलें म्लेंच्छहातीं
मला प्राप्त, दुर्वारणीय स्थिती ती ! ॥१०२॥

असें जेव्हां मातें कुटिल यवनीं आर्य लुटिलें
उपेक्षीलें तुह्मी तरिहि नच मद्धैर्य सुटलें ।
विचारा केलें कीं प्रभुसि तरि येईलच दया
ह्मणून प्रार्थीलें नतभयविनाशास सदया ॥ १०३॥

हे ज्ञानखाणि ! भगवन् ! तव कन्यका ही
दुष्टीं छळीलि असतां न पहासि कांहीं ? ।
रक्षी विभो पदनता धरितें पदातें
वारील कोण तुजवीण ममापदांतें? ॥ १०४ ॥

कारुण्यमेघ! पतितोद्धर! दीनपाळ!
भक्तत्रितापहर आर्तसुहृत्कृपाळ ।
आहेस तूं तव सुकीर्ति असंख्य संत
गाती सदा तव कृपामृत ज्यां पसंत ॥१०५॥

जेव्हां सुयोधन छळी बुधवंद्य कृष्णा
रक्षी त्वदन्य तिजला वद कोण कृष्णा? ।
कृष्णापतीविजय कोण करी त्वदन्य?
तूं भक्तवत्सल दयाघन तूं वदान्य ॥१०६॥

सृष्टिस्थितिप्रलयकारक! दुःखहारी!
आलें तुला शरण सज्जनहृद्विहारी! ।
सप्रेम आळवुनियां तुजला दयाळा
दीनस्वरें वदतसें 'मज नाथ पाळा' ॥१०७॥

पाळा तदा ध्रुव पदां स्मरतां मुकुंदा!
वृंदारकांहि वधुनी असुरेशवृंदा ।
वृंदावनार्पितकृपामृतगोपिवृंदा!
नंदात्मजा! मजहि द्या स्वकृपामरंदा॥१०८॥

कारुण्यसागर असें अभिधान ज्यातें
येईल भक्तकरुणा न कशी अजातें? ।
यच्चिंतनेंचि तरले बहु रंक राणे
खोटेंच काय कथिती अवघीं पुराणें? ॥१०९

स्वजन म्हणति तेव्हां "घोर हो काळ आला !
हर ! हर ! हर ! मोठा ईश्वरी कोप झाला !! ।
धरुनि यवनरूपा आर्यदेशीं कृतांत
खचित उतरला हा हाय ! हा ! हंत !! हंत"!!! १००

प्रकारें अशा गांजिती म्लेंच्छ दुष्ट
प्रकारें अशा बोलती आर्य शिष्ट ।
परी हांकण्या म्लेंच्छ लोकांस दूर !
नसे तेधवां एकही आर्य शूर ! ॥ १०१ ॥

यशोदीपिका सर्व तेव्हां विझाली
लुटूनी मला आर्यसंपत्ति नेली ।
पुढें राहणें जाहलें म्लेंच्छहातीं
मला प्राप्त, दुर्वारणीय स्थिती ती ! ॥१०२॥

असें जेव्हां मातें कुटिल यवनीं आर्य लुटिलें
उपेक्षीलें तुह्मी तरिहि नच मद्धैर्य सुटलें ।
विचारा केलें कीं प्रभुसि तरि येईलच दया
ह्मणून प्रार्थीलें नतभयविनाशास सदया ॥ १०३॥

हे ज्ञानखाणि ! भगवन् ! तव कन्यका ही
दुष्टीं छळीलि असतां न पहासि कांहीं ? ।
रक्षी विभो पदनता धरितें पदातें
वारील कोण तुजवीण ममापदांतें? ॥ १०४ ॥

कारुण्यमेघ! पतितोद्धर! दीनपाळ!
भक्तत्रितापहर आर्तसुहृत्कृपाळ ।
आहेस तूं तव सुकीर्ति असंख्य संत
गाती सदा तव कृपामृत ज्यां पसंत ॥१०५॥

जेव्हां सुयोधन छळी बुधवंद्य कृष्णा
रक्षी त्वदन्य तिजला वद कोण कृष्णा? ।
कृष्णापतीविजय कोण करी त्वदन्य?
तूं भक्तवत्सल दयाघन तूं वदान्य ॥१०६॥

सृष्टिस्थितिप्रलयकारक! दुःखहारी!
आलें तुला शरण सज्जनहृद्विहारी! ।
सप्रेम आळवुनियां तुजला दयाळा
दीनस्वरें वदतसें 'मज नाथ पाळा' ॥१०७॥

पाळा तदा ध्रुव पदां स्मरतां मुकुंदा!
वृंदारकांहि वधुनी असुरेशवृंदा ।
वृंदावनार्पितकृपामृतगोपिवृंदा!
नंदात्मजा! मजहि द्या स्वकृपामरंदा॥१०८॥

कारुण्यसागर असें अभिधान ज्यातें
येईल भक्तकरुणा न कशी अजातें? ।
यच्चिंतनेंचि तरले बहु रंक राणे
खोटेंच काय कथिती अवघीं पुराणें? ॥१०९

तोषूनि स्तवनें प्रसन्नवदनें
मत्संकटा जाणिलें
द्यावें साह्य अनाथ हे अति हिला
चित्तांत हें आणिलें।
"दुष्टांपासुन रक्षितों तुज" ह्मणे
"शोका असे काज ना
धाडीतों तव रक्षणार्थ तनये
मी पश्चिमस्थां जनां" ॥ ११० ॥

ह्मणून जगदीश्वरें त्वरित इंग्रजां धाडिलें
तिहीं प्रभु-वरें इथें यवनसैन्य संताडिलें।
पुढें सकल घेतली भरतखंड–सत्ता करीं!
अशक्त अति आर्य हे इतर कोण ह्यां सांवरी? १११

असे ह्या अतां स्वस्थता आर्यदेशीं
न ते गांजिती भ्रष्टनीती विदेशी।
सुविद्यामृता पाजुनी आंग्लभौम
तुह्मां बोधिती स्वीय कर्तव्यकर्म ॥ ११२ ॥

व्हावें अतां तरि तुह्मी सुत सावधान
द्वेषादि दुर्धर रिपू अजि कां वधा न?।
देशाभिमान हृदयीं दृढ आर्य ठेवा
ठेवा दुरीं लवकरीं मदगर्वहेवा ॥ ११३ ॥

ठाणे नं. ८७ सन १८०४

धरा नित्य चित्तीं स्वदेशाभिमाना
स्वसौख्यापरी देशसौख्यास माना ।
अशा ह्या सुरत्ना जरी ना वरावें
तरी जन्मुनी काय लोकीं करावें ? ॥ ११४ ॥

जगीं जन्मती पक्षिपश्वादि जाती
असंख्यात त्या मृत्यु-पंथेंहि जाती ।
तयांसारिखा जन्मुनी व्यर्थ लोकीं
स्वदेशाभिमानी न जो तो विलोकीं ॥ ११५ ॥

पशूपक्षिजाती मुळीं बुद्धिमंद
कराया स्वकार्या परी त्या अमंद ।
गृहा रक्षण्या स्वीय यत्नां करीती
न हे ठाउकी काय आर्यांस रीती ? ॥ ११६ ॥

स्वदेशीं रती म्लेंछ लोकींहि राहे
वरीनाच कां सुज्ञ आर्यां नरां हें ? ।
हिला राखण्या नित्य यत्नां करा हो
प्रयत्नें कशी ही न आर्यांत राहो ? ॥ ११७ ॥

स्वयें एक लक्ष प्रजा वीस कोटी
स्वसत्तेमधें ठेविती थोर मोठी ।
किती धूर्त हे पाश्चिमात्यांग्लभौम !
जपाया तुह्मां लाविती रामनाम !! ॥ ११८ ॥

कशी बंधुभक्ती ! कसा स्वाभिमान !
किती चातुरा ! शौर्य कैसें महान ! ।
पहा पुत्र ! ह्या आंग्लभौमांत कैशी
वसे ऐक्यता ! प्रीति कैशी स्वदेशीं ! ॥ ११९ ॥

तयांच्या अशा शंसनीया गुणांतें
वरा सत्वरें तोषवा मन्मनातें ।
'किती आर्य हे स्वीयदेशाभिमानी'
कधीं मी असे शब्द ऐकेन कानीं ? ॥ १२० ॥

न घेतां अशा श्लाघनीया गुणांतें
तयांच्या तुम्ही सेवितां दुर्गुणांतें ।
तुह्मा वारुणी-संगती गोड वाटे !
स्वभक्तां सुरा लाविती दुःख-वाटे ॥ १२१ ॥

तुह्मावांचुनी तोषवी मन्मनातें
दुजें कोण हो ? पुत्र सांगा मला तें ।
दशा पाहुनी गर्ह्य हे युष्मदीय
हृदभ्यंतरीं कंप सूटे मदीय ॥ १२२ ॥

तुह्मां दुःख जें दुःख होई मला तें
तुह्मां सौख्य जें तोच आनंद मातें ।
स्वपुत्रां प्रियां नित्य दुःखी पहातां
कशी अंतरीं सौख्य पावेल माता ? ॥ १२३ ॥

---

१ मद्य.

ह्मणून कथिलें तुह्मां उचित जें मला वाटलें
करा ग्रहण जें गमे निजमनीं तुह्मां चांगलें ।
स्वपूर्वजपराक्रम स्मरुन धैर्य चित्तीं धरा
रिघा शरण भक्तिनें प्रभुवरा कृपासागरा ॥१२४ ॥

धरा बंधुभक्ति त्यजा द्वेषबुद्धि
धरा नीति चित्तीं करा चित्तशुद्धि ।
करा उद्यमें देशसंपत्तिवृद्धि
तुह्मा सच्चिदानंद देवो सुबुद्धि " ॥ १२५ ॥

असें ऐकतों तों उषःकाळ झाला
सरे रात्र ती सर्व अंधार गेला ! ।
रथारूढ तों जाहला चंडकीर्ण
दिशा जाहल्या सर्वही सुप्रसन्न ॥ १२६ ॥

जागा झालों पाहतों विस्मयानें
केला भासे खेळ हा ईश्वरानें ! ।
झाली देवी गुप्त मंदीर तुंग !
तैशी संसत् ! काय हा स्वप्नरंग ! ! ॥ १२७ ॥

होवो पर्जन्यवृष्टी
समुचित समयीं सौख्यसंपत्समृद्धी
होवो ह्या आर्यखंडीं
निजजन निजदेशाभिमानी सुबुद्धी

देशप्रीती विराजो
निजजनहृदयीं नीति आर्यांस भावो !
देशाचें दैन्य जावो
सकल निजजनां सच्चिदानंद पावो !

इति पद्यसुधायां भारतवर्षिणीकाव्यं समाप्तम्.

मृत्यु.

प्रारंभः

हा ! नाथ ! नाथ ! वदतां असु पंच ज्यांचे
शोकानलीं अनिश विप्लुत होति साचे ।
ह्याकारणें करिति ज्या तव चिंतनातें
कां दाविशी न मुख त्या विधवाजनांतें ? ॥ १ ॥

ज्यांचीं अतीव मृदु कोमल रम्य अंगें
केलीं विदग्ध सुतराम् मदनें अनंगें ।
द्यावें तुवां सदय होउन दर्शनातें
ह्याकारणें करिति ज्या तव चिंतनातें ॥ २ ॥

ज्यांचीं विशुद्ध हृदयें नवनीतकल्प
अत्यंत कोमल जयांत नसे विकल्प ।
झालीं विदीर्ण शतधा पतिच्या वियोगें
ज्या वांच्छिती पतिसमागम मृत्युयोगें ॥ ३ ॥

"हे वल्लभासुहर ! अंतक ! हे कृतांत !
हे मृत्युराज ! मज भेटिव तूर्ण कांत !!"
ह्या रीतिनें करिति ज्या तव चिंतनातें
कां दाविशी न मुख त्या विधवाजनांतें? ॥ ४ ॥

वासंत ते पवन मंद विमंद येती
संताप वारून जनांस सुखी करीती
ते भासती परम आपद ज्या स्त्रियांतें
त्यांच [illegible] किमर्थ हारिशी प्रिय वल्लभांतें? ॥ ५ ॥

ते कंचुकीरहित ह्यास्तव खिन्न साचें
हो [illegible] मतें सुपयोधरांचें।
देई [illegible] जयां विकल व्यथेतें
हा ! हंत ! कां हारशि त्या तरुणीपतींतें ?॥ ६ ॥

आकांक्षिती जन तयां जवळीं न जाशी
ज भीति त्यांसचि बळें स्वगृहास नेशी !।
ह्या कारणास्तव मिळे तुजला न मित्र
मृत्यो ! जनां तव कृती गमते विचित्र !! ॥ ७ ॥

नवांकुरितयौवना द्विजवधू सुचंद्रानना
स्वकीयपतिसंगमातुरमना मनीं कामना।
अनेकविध योजिती रतिसुखार्थ तों दुष्ट हा
त्वदीय गण येउनी प्रियपतीस नेतो अहा !! ॥ ८ ॥

सुविप्रगतभर्तृका गति कठीण वा संप्रति
तयांस करवे सख्या ! न च पुनर्विवाहाप्रति ।
ह्मणून तरुणीसती–पतिसवें न लोभा धरी
जगांत असती वहू तुजसिं योग्य त्यां आदरी ॥९॥

जे झीजवीति निजदेह परोपकारीं
ज्यांला स्वदेशजननी प्रिय फार भारी ।
रत्नें सुदुर्लभ अशीं ह्मणि चोरण्यातें
लज्जा न केविं गमते तुझिया मनातें ? ॥ १० ॥

नेला ह्मणी स्वसदनास गणेशपंत
तो वासुदेवसुत आर्यजनां पसंत ।
ज्याच्या कृती ! अहह !! रत्न असें हरावें !!
मृत्यो ! अशा अनुचिता नच आचरावें ॥ ११ ॥

गुंफूनीयां रुचिर अवघीं शब्दमाधुर्यरत्नें
ज्यानें माला[1] रचुनि विमला मोददा सुप्रयत्नें ।
अर्पूनीयां सुरुचिरमहाराष्ट्रभाषावधूतें
'अस्मद्भाषा प्रियपति' असें जोडिलें रम्य नातें ॥१२॥

देशप्रीति प्रखर विलसे ज्याचिया हृत्प्रदेशीं
व्हावी वाटे निजमनिं जया स्वीयसत्ता स्वदेशीं ।
अस्मद्देशस्थिति वघुनि जो खेद अत्यंत पावे
हा ! हा ! ऐशा बुधनुतनरा[2] काय मृत्यो हरावें ! १३

---

१ निबंधमाला. २ विष्णु शास्त्री चिपळूणकर.

करीति अधमा कृती बुधजनांस संत्रासिती
धनांध विषयांध भूवरि कृतांतसे भासती ।
तुझी अनुकृति स्वयें करिति मित्रता त्यांसवें
करून सदनास ने जमवि रम्य नातें नवें ॥ १४ ॥

समाप्त.

शिवाजी.

प्रारंभः

आर्यावर्तीत जेव्हां
यवन पसरले घोर कल्होळ झाला
स्वातंत्र्याचा सुतेजो-
मय रुचिर महा दीप जेव्हां विझाला ।
गेल्या संपत्ति कीर्ती
निजजन अवघे जाहले शौर्यहीन
'दिन् दिन्' शब्दां मदानें
म्हणति यवन तैं आर्य 'मी दीन! दीन!' ॥१॥

एका करीं घेउनियां कुराण
द्वितीय हस्तीं समशेर तीक्ष्ण ।
बोले मुसल्मान् मम धर्म घ्यावा
किंवा वरावें समशेर-घावा ॥ २ ॥

छळिति यवन भारी फार संत्रास देती
करिति अधम कृत्यें सज्जनां नागवीती ! ।
सुजन, यवनधाकें देश सोडून जाती
अहह ! कठिण मोठी आर्यदेशस्थिती ती !! ॥३॥

अशा संकटीं कोण आम्हांस तारी ?
शिवाजी ! तुझ्यावांचुनी साह्यकारी ।
दुजा जाहला कोणता वीर राया ?
तुवां जन्मुनी धन्य केली स्वकाया ॥ ४ ॥

स्वसत्तारुची कोण आह्मांस दावी ?
तुझी थोरवी काय आम्ही वदावी ! ।
करूनी रणीं शूर त्या मावळ्यांनां
मराठ्यां जनां देववी कोण माना ? ॥ ५ ॥

मराठ्यांमधें स्वीय देशाभिमान
वसे केवढा ! धैर्य कैसें महान ! ।
जगा दाविलें मारुनी त्वां लढाया
जनीं ठाउकें व्यर्थ नाहीं वढाया ॥ ६ ॥

तुवां स्थापिली स्वीयसत्ता स्वदेशीं
स्वशत्रू तसे हांकिले दूरदेशीं ! ।
महाराष्ट्र हें जाहलें थोर बापा
प्रसादें तुझ्या काय वर्णू प्रतापा ॥ ७ ॥

केली 'नूतन भूमिका' वहु सुखी त्या जार्ज वाशिंग्टनें
अस्मद्देश तसा तुवां सुमतिनें योजूनियां साधनें ।
केला, हा उपकार फारचि महाराष्ट्रावरीं जाहला
राष्ट्रीं या तुजसारिखा नच सुधी राजा दुजा शोभला ८

तो रायवाजि पहिला वहु शूरवीर
शिंदा महादजि महारणरंगधीर ! ।
तत्रापिही तुजसमान दिसे न अन्य
अस्मज्जनीं समरधीर सुधी वदान्य ! ॥ ९ ॥

निंदोत निंदक सुखें तुजला शिवाजी !
वोलोत चोर अथवा तुजला न गाजी ।
आह्मां गमे प्रिय सख्या ! तव नाम मोठें
देवासमान तुज मानिती हे मराठे ॥ १० ॥

जुनें वैभव स्वप्नवत् आज झालें !
मराठ्यांतुनीं शौर्य कैसें पळालें !! ।
दिसेना अतां ते तुझी राजधानी !
जिथें शोभले लोक देशाभिमानी ॥ ११ ॥

पुरा गर्जती वीर जेथें मराठे
जयां पाहतां म्लेंछ हृद्देश फाटे ! ।
शिवा श्वापदें क्रंदती तेथ आतां !
अहा ! चित्त तें खिन्न होतें पहातां !! ॥ १२ ॥

घनाजी तुलाजी यशोकंक गेले
महाराष्ट्र निस्तेज हें रंक झालें ! ।
सुरम्या तुझी राजधानी बुडाली !
मराठ्यां रमा सोडुनी दूर गेली ! ॥ १३ ॥

तुझे दुर्ग जे भव्य मोठे पहाडी
तिथें दीसती श्वापदें वृक्ष झाडी ! ।
भवानी तुझी म्लान भासे उदास !
मिळेना तिला जाणता शूर दास ॥ १४ ॥

दिसे त्वत्कुळीं वीर आतां न मोठा
जयाच्या मनीं शौर्यसामर्थ्य–ताठा ।
तुझें जाहलें नष्ट राया घराणें !
मराठ्यां अहा ! हेंच नेत्रीं पहाणें ! ॥ १५ ॥

तुझ्या वंशजीं दीसती ना शहाणे !
तयांला अतां बोलतो कोण राणे ? ।
दयाळू असे आमुची थोर राणी
तयां वेतना देतसे ती शहाणी ॥ १६ ॥

नांदे तें करवीरराज्य सुकुळीं राया ! तुझ्या संप्रति
व्हावे तेथ तरी तुझ्यासम सुधी इच्छा मनीं भूपति! ।
हा! हा! हंत!! परंतु हेंच बरवें त्या माधवा आवडे
व्हावे आर्यकुलावतंस–सुकुळीं राजे खुळे बापुडे! १७

व्हावा तुझ्यासम सुधी करवीरभूप
हे शंसनीय धरुनी सुजनीं हुरूप।
त्यातें दिलें मधुर नाम तुझें शिवाजी
व्हावा कसा विगतधी नृप तो समाजीं ! ॥ १८ ॥

आतां न काय निपजेल दुजा शिवाजी ?
आर्यांत काय नच होइल अन्य गाजी ? ।
वीरप्रसू सकल आर्यजनांत आतां
हा ! हंत ! कां न निपजे दुसरी सुमाता ? ॥ १९ ॥

झालों आर्य अनार्य काय अवघे
आह्मी अहा ! पातकी
बंधुद्रोहक भक्तिहीन अथवा
आहों महा घातकी ! ।
किंवा काळचि पातला कठिण हा
कांहीं कळेना मला
साध्वी काय नसे जिजा[1]सम अतां ?
धिक्काल ! धिग्धिग्तुला !! ॥ २० ॥

धन्या तुझी सुजननी सुभगा शिवाजी !
ते कामधेनुच गमे प्रसवे शिवा जी ।
आर्यावतंसनृपती उदरीं विराजे
लोकीं जिजाई–महिमा मग कां न गाजे ? ॥ २१ ॥

---

1 जिजाबाई.

शिवाजी ! कैलासीं वससि जरि वा इंद्रभुवनीं
हरीच्या वैकुंठीं अमितसुखदीं नंदनवनीं ।
सकृद् धांवें प्रेमें अवतर सकृत् स्वीय सुकुळीं
कृपालेशें नाशीं निजजनगणापत्ति सगळी! ॥ २२ ॥

समाप्त.

अहल्याबाई आणि मुक्ताबाई.

प्रारंभः

अर्वाचीन काळीं आमच्या देशांत अहल्याबाई होळकरीण ही एक विख्यात साध्वी होऊन गेली. हिचें चरित्र फारच चित्तवेधक आहे, व हिची सत्कीर्ति आजपर्यंत भरतखंडभर गाजत आहे, हें सर्वप्रसिद्ध आहे. हिला मुक्ताबाई नांवाची एक कन्या होती. मुक्ताबाई भर तारुण्यदशेंत येतांच तिचा पति निवर्तला. पतीसमागमें सहगमन करण्याचा मुक्ताबाईनें निश्चय केला; त्या वेळीं, तिनें सती न जावें ह्मणून तिला अहल्याबाईनें विनंतिपूर्वक केलेला बोध, व त्याजवर मुक्ताबाईनें दिलेलें प्रत्युत्तर, ह्यांचें पुढील पद्यांत वर्णन आहे.

अहल्याबाईः— साक्या.

“सोडी सोडी सोडी वेडे
व्यर्थ दुराग्रह सोडी ।
भूलोकीं ह्या करुनि सत्कृती
कीर्ति अखंडित जोडी ॥ १ ॥

तुजविण जिवलग कोण सखे!
मज? कोण प्रियतम अन्य? ।
धरुनि निजमनीं सौजन्यातें
वचन करीं मम मान्य ॥ २ ॥

इंदुमुखी! तव चंदनशीतल
सुंदर कोमल काया ।
हर!हर! मुग्धे! दग्ध करूनी
दुखविशि जीवा कां या!! ॥ ३ ॥

हत्ती घोडे रत्नभूषणें
देइन तुजला बाळे!।
दासी होउन राहिन तव मी
जाउं नको वेल्हाळे! ॥ ४ ॥

पुरविन सर्व मनोरथ तव हें
देइन राज्य तुला मी ।
इंदुरनगरीं इंदुमुखी! तूं
राहीं सुंदर धामीं ॥ ५ ॥

नाजुक कोमल काया तव जे
अरुणरश्मिनें तापे ।
सोशिल कैशी पावकतापा?
हृदय सखे! मम कांपे! ॥ ६ ॥

हंत ! हंत ! गे कृतांत तुजला
वाटे कसा पसंत ! ।
आत्मघात अति अनुचित म्हणती
लोकीं संत महंत ॥ ७ ॥

ईशें दिधला देह न त्याचा
आपण नाश करावा ।
आत्मघात कां करुनि निजशिरीं
पातकपर्वत घ्यावा ? ॥ ८ ॥

अभिमन्यूची सुंदर ललना
प्रियपतिविरहा सोशी ।
सहगमनातें न करीं ऐसें
कृष्ण तिला उपदेशी ॥ ९ ॥

आठिव निजमनिं सर्व सखे ! तें
कलियुगकाळिं तशांत ।
सहगमन श्रेयस्कर म्हणति न
साधू सज्जन संत ॥ १० ॥

तुजविण वत्से ! मुक्ते ! ऐशी
हांक कुणातें मारूं ? ।
हर ! हर ! कैशी राहुं एकटी ?
कैसें दुःख निवारूं ? ॥ ११ ॥

कोण सखे ! प्रिय मंजुळ वचनीं
मच्चिता रिझवील ? ।
कोण तुझ्याविण मम हृदयांतिल
दुःखाग्नी विझवील? ॥ १२ ॥
आला दाटुन कंठ सखे ! मम
नेत्रीं अश्रु वहाती ।
व्याकुळ हृदया झालें, घेशी
अपमृत्यू कां हातीं," ॥ १३ ॥

मुक्ताबाई*:—

"जननी ! मज तूं उपदेशिशि तें
यथार्थ आहे सारें ।
परि असती ह्या मृत्युलोकिंचे
व्यर्थाचि सर्व पसारे ! ॥ १४ ॥

टाकुनि गुंतविशी मज कांगे ?
मोहजालमय पाशा ।
प्रियपति टाकुन ठेवूं कैशी ?
वित्तसुखावर आशा ॥ १५ ॥

देशी मज जरि राज्यपद तरी
कोणासंगें भोगूं ? ।
पतिविण सांगे कोणासंगें
सुखदुःखास विभागूं ? ॥ १६ ॥

* अनेकविद्यामूलतत्त्वांतील अहल्याबाईच्या वर्णनांत हिचें नांव 'मंचाबाई' असें दिलें आहे.

पति स्त्रियांचें उत्तम दैवत
पतिच्या ठायीं प्रेम ।
ठेउन अनुदिन तत्पदसेवा
करणें हाचि सुधर्म ॥ १७ ॥

ऐसें उपदेशिशी पुरा मज,
काय नसे तुज ठावें ? ।
आतां जननी ! कसें तुवां हें
तद्विपरीत वदावें ? ॥ १८ ॥

पावकताप सुदुःखद ऐशी
धरिशी कां तूं भीती ? ।
आर्यजनांच्या अवला न कधीं
पावकतापा भीती ! ॥ १९ ॥

जन्मुनि उत्तम आर्यकुळीं म्यां
सहगमना कां भ्यावें ? ।
पतिसह जाउन सतीपदातें
कां न सखे ! मिळवावें ? ॥ २० ॥

राहिन जरि मी भूलोकीं मज
पीडिल न कां अनंग ? ।
अहह ! दुःख तें सोसुं कसें जें
भाजिल मदन मदंग ? ॥ २१ ॥

यास्तव वाटे समुचित मज कीं
पतिसह नाकीं[1] जावें ।
प्रियपतिसंगें अमरमंदिरीं
आनंदांत बसावें ॥ २२ ॥

नेत्रांतुन तव टपटप गळती
अश्रू सखे ! किमर्थ ! ।
टाकुं नको मज मायाजाळीं
साधूं दे परमार्थ ॥ २३ ॥

जातें स्वर्गीं आनंदानें
मग कां होशी खिन्न ! ।
देई मजला अनुमति सदये ! !
होई सखे ! प्रसन्न ॥ २४ ॥

देतिल मजला मान सखे ! त्या
वृंदारकगणनारी ।
पाहिन वंदिन नंदननायक
विधि माधव मदनारी ॥ २५ ॥

येतें आतां लोभ असूंदे
खेद न चित्तीं मानीं ।
प्रियपतिसंगें स्वर्गीं जाइन
बैसुन दिव्य विमानीं" ॥ २६ ॥

---

१ स्वर्गी.

फासेट.

The right Honorable Mr, Fawcet M. P.

प्रारंभः

कविचें कर्तव्य असे
स्तुत्य उचित सत्य नित्य बोलावें ।
न्यायतुला करिं घेउन
साधूंच्या सद्यशास तोलावें ॥ १ ॥

स्वविषयभद्रपरायण[1]
सज्जनवृंदां सहर्ष मानावें ।
हृद्य सुपद्यफुलांच्या
गुंफावीं मालिकेंत तन्नावें ॥ २ ॥

म्लेंछ असो यवन असो
त्याची कविला असेच ना परवा ।
निजजनभद्रपरायण
सज्जन कविला गमे सदा बरवा ॥ ३ ॥

अंध असुनि चंदनसम
देहा झिजवी परार्थ फासेट ।
आप्तपरापर नेणे
सत्यप्रतिपादनीं महाधीट ॥ ४ ॥

---

१ स्वदेश.

आर्यांची दीनदशा
देखुनियां कळवळे मनीं भारी।
परदुःखें दुःखित जो,
आम्ही त्याचे सदैव आभारी ॥ ५ ॥

आर्यावर्तनिवासी
नाहीं आह्मी कृतघ्न उपकारीं।
उपकृत्यभिज्ञ सुतरां
जैसे भारी सहिष्णु अपकारीं॥ ६ ॥

गावे संतत तद्गुण
संतसमाजीं सहर्ष आर्यांनीं।
तद्गृहिणी–सद्गुणही
मंजुळ सुस्वादु गोड आर्यांनीं ॥ ७ ॥

दीर्घायु देव देवो
फासेटाचा असो सदा विजय।
रक्षो ईश्वर त्यातें
श्रीकृष्णें रक्षिला जसा विजय ॥ ८ ॥

समाप्त.